महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन

पद : संशोधन अधिकारी.

कार्यकक्षा व जबाबदाऱ्यांचे विवरणपत्र

(Terms of Reference – TOR)

धोरणात्मक संशोधन, विकासात्मक योजनांचे मूल्यमापन, माहिती विश्लेषण व संशोधन अहवाल तयार करणे.

कामासाठी अपेक्षित अनुभव : महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांमध्ये संशोधन अधिकारी किंवा समकक्ष जबाबदारीच्या पदावर कार्य केलेल्या पात्र अधिकाऱ्यांकडून सेवा उपलब्ध करून घेणे.

कामाचा उद्देश :

महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक, सामाजिक व विकासात्मक क्षेत्रांशी संबंधित धोरणात्मक संशोधन करणे, विविध शासकीय योजनांचे मूल्यमापन करणे, उपलब्ध माहिती व आकडेवारीचे विश्लेषण करणे तसेच महाराष्ट्र इन्स्टिट्यूशन फॉर ट्रान्सफॉर्मेशन (MITRA) च्या धोरणात्मक अभ्यास व संशोधन उपक्रमांसाठी संशोधनाधारित माहिती व शिफारशी उपलब्ध करून देणे.

विवक्षित कामाचे स्वरूप व जबाबदाऱ्या :

१. महाराष्ट्र राज्याच्या विकासाशी संबंधित विविध क्षेत्रांमध्ये संशोधन व धोरणात्मक अभ्यास करणे.

२. राज्याच्या आर्थिक, सामाजिक, औद्योगिक, कृषी, पायाभूत सुविधा, शहरी विकास, शिक्षण, आरोग्य व पर्यावरणविषयक क्षेत्रांतील माहितीचे संकलन व विश्लेषण करणे.

३. महाराष्ट्र शासनाच्या विविध विभागांकडून तसेच संबंधित संस्थांकडून संशोधनासाठी आवश्यक माहिती व आकडेवारी संकलित करणे.

४. विविध शासकीय योजना व विकासात्मक कार्यक्रमांच्या अंमलबजावणीचा अभ्यास करून त्यांचे परिणाममूल्यांकन करणे.

५. राज्याच्या विकास निर्देशांकांचा व क्षेत्रनिहाय प्रगतीचा अभ्यास करून आवश्यक निष्कर्ष व शिफारशी सादर करणे.

६. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील सर्वोत्तम कार्यपद्धतींचा अभ्यास करून महाराष्ट्र राज्यासाठी उपयुक्त धोरणात्मक उपाययोजना सुचविणे.

७. संशोधन प्रकल्पांसाठी आवश्यक संकल्पनापत्र (Concept Note), संशोधन आराखडा (Research Framework) व कार्यपद्धती तयार करणे.

८. विविध विद्यापीठे, संशोधन संस्था, शासकीय विभाग व विषयतज्ज्ञ यांच्याशी संशोधनविषयक समन्वय साधणे.

९. आवश्यकतेनुसार क्षेत्रभेटी, सर्वेक्षणे, हितधारक चर्चा व माहिती संकलन उपक्रम राबविण्यासाठी सहाय्य करणे.

१०. संशोधन निष्कर्षांच्या आधारे धोरणात्मक टिपणे (Policy Briefs), संशोधन अहवाल व सादरीकरणे तयार करणे.

११. उपलब्ध आकडेवारीचे विश्लेषण करून विकासात्मक धोरणे व कार्यक्रमांसाठी पुराव्याधारित शिफारशी सादर करणे.

१२. संस्थेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना आवश्यकतेनुसार विशिष्ट विषयांवरील संशोधनाधारित माहिती व विश्लेषण उपलब्ध करून देणे.

आवश्यक पात्रता व अनुभव :

१. शासनाच्या विभागात संशोधन अधिकारी अथवा समकक्ष पदावर अधिकारी असणे अपेक्षित.

२. संबंधित संशोधन व विश्लेषणात्मक कामाचा किमान ३ वर्षांचा अनुभव आवश्यक.

३. संशोधन पद्धती, सांख्यिकीय विश्लेषण व संशोधन अहवाल लेखनाचे ज्ञान आवश्यक.

५. MS Excel, PowerPoint, Word किंवा तत्सम साधनांचे ज्ञान अपेक्षित.

६. मराठी व इंग्रजी भाषेतील लेखन व सादरीकरणाचे कौशल्य आवश्यक.

७. शासन निर्णयानुसार संबंधित संवर्गाची पात्रता, वयोमर्यादा, आरोग्यविषयक क्षमता व इतर अटी पूर्ण करणे आवश्यक.

- **अपेक्षित निष्पत्ती (Deliverables) :**

१. विषयानुरूप संशोधन अहवाल.
२. धोरणात्मक अभ्यास व मूल्यमापन अहवाल.
३. क्षेत्रनिहाय माहिती व आकडेवारीचे विश्लेषण.
४. धोरणात्मक टिपणे व शिफारशी.
५. संशोधन प्रकल्पांची प्रगती व अंतिम अहवाल.
६. वरिष्ठ अधिकाऱ्यांसाठी विषयानुरूप सादरीकरणे.

नियुक्तीचे स्वरूप :

सदर सेवा शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १० जून २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदी व MITRA ला लागू असलेल्या मान्य कार्यपद्धतीनुसार विशिष्ट संशोधन व धोरणात्मक कामांसाठी करार पद्धतीने उपलब्ध करून घेण्यात येईल. ही नियुक्ती नियमित मंजूर पदावरील नियुक्ती समजण्यात येणार नाही.

कामाचा कालावधी :

प्रथम नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एक वर्षासाठी राहील. आवश्यकतेनुसार शासन निर्णयातील तरतुदीनुसार नूतनीकरण करता येईल. एकूण कालावधी तीन वर्षांपेक्षा अधिक राहणार नाही.

पारिश्रमिक व इतर अटी :

मासिक पारिश्रमिक व अनुज्ञेय भत्ते सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १० जून २०२५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार निश्चित करण्यात येतील. इतर अटी व शर्ती सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेनुसार नियुक्ती करारामध्ये नमूद करण्यात येतील.